संं.फौ.ख.क्र २४९/२०२५
शासन -वि- विवेक
**(नि.क्र.१०)**

## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की–

माझे नाव :– भानु मदनसिंग पुनिया,

वय :– २५ वर्षे,

व्यवसाय :– मजुरी,

राहणार :– कांडली, परतवाडा, ता. अचलपुर, जि. अमरावती .

––––

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. आय. वाय. पठाण यांच्यामार्फत**

१. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलविले नव्हते. माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा झाला नाही. मी केवळ पोलीसांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर माझी स्वाक्षरी केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर माझ्या परीचयाचा नाही. त्यावर क्र.२ येथे माझी स्वाक्षरी आहे. ती मी ओळखतो.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास संपला.**

**(सदर साक्षीदार सरकार पक्षास सुसंगत उत्तर देत नसल्यामुळे,**
**सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली.**
**परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९.१२.२०२४ रोजी सायंकाळी ६.०० ते ६.३० चे दरम्यान पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्यासाठी मिश्रा चौक परतवाडा येथे पंचनामा करण्याकरीता बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष घटनास्थळाचा वस्तुस्थितीप्रमाणे पंचनामा करण्यात आला, त्यानंतर मला सदरचा पंचनामा वाचुन दाखविण्यात आला व त्यानंतर मी त्यावर माझी स्वाक्षरी केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या परीचयाचे असल्याने त्यांना

वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**अभियोग पक्षातर्फे उलटतपास संपला.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री. एस. एस. राठोड वकील यांनी नाकारला**

**फेरतपास काही नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत,**

Sd/-

(सी. एस. देशपांडे)
प्रथमवर्ग न्योयदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, अचलपूर

ठिकाण :- अचलपूर.
दिनांक :- ०८/०४/२०२६.